# MODEL QUESTION PAPER SET-1: 2021 - 22

**MM : 80** **Std. 10th – MARATHI (THEORY)** **Time : 3 Hrs**

**Entire Syllabus**

**सूचना:**

१. आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या सूचनेप्रमाणे काढा.
२. निळ्या शाईच्या पेनचाच उपयोग करा.
३. आकृत्या काढण्यासाठी पेनचाच उपयोग करा.
४. उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृती काढण्याची किंवा कृती लिहून घेण्याची आवश्यकता नाही.
५. लेखननियमानुसार तसेच नीटनेटके लिहावे.

---

## विभाग १- गद्य

## पठित गद्य

**प्र.१.(अ)खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[7M]**

**१) उत्तरे लिहा.** **(२)**

१) पुल व सुनिताबाई यांनी दिलेल्या शालीचा लेखकाने पाठात केलेला उल्लेख ☐
२) पाठात उल्लेख असणारी नदी ☐
३) सभासंमेलने गाजवणारे कवी ☐
४) लेखक विश्वकोशाचे अध्यक्ष म्हणून गेलेले ठिकाण ☐

एकदा मी पु.. देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढ्यात सुनीताबाईनी मला थांबवले व विचारले, "तुम्हाला शात दिली तर चालेल काय?"

मी एका पायावर 'हो' म्हटले. पु. ल. व सुनीताबाई यानी मला शाल दयावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली. बापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोटया तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली, पाचपन्नास रुपयाच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, "त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे भारत बैस या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती. कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजयत पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामतः त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, "या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागतो आहे. "

२) **खालील प्रसंगी लेखकाने केलेली कृती.** (२)

एका बाईचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत होते

३) स्वमत - लेखकाच्या भावना 'शाल' या वस्तूशी निगडी आहेत. तुमच्या आवडीच्या वस्तूशी निगडीत असल्या भावना तुमच्या शब्दात लिहा (३)

**प्र.१. (आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[7M]**

**१. कारणे लिहा.** (२)

१) माशेलकरांना माशेल सोडावे लागले. कारण .......................

२) वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत माशेलकरांना अनवाणी राहावं लागलं, कारण .......................

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. तिथल्या एका मैदानावर खेळल्याच्या आणि पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हाला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहोचलो. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये 'मालती निवासा' तील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहात होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली दारिद्र्याशी संघर्ष करणारी माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला; पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ?' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्यावेळचं वातावरण हे असं होते !

पण माझ्या आईनं धीर सोडला नाही. ती खचली नाही. वेगवेगळी कष्टाची कामं ती करत होती. त्यातच माशेलहून मुंबईत आलेले माझे मामाही मदतीला आले. त्याच्यामुळे मला खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला. ही शाळा महापालिकेची होती. माझ्याप्रमाणेच शाळेचीही परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र मनाने खूप श्रीमंत होते. पायात चप्पलही घालायला नव्हती अशा परिस्थितीत माझी शाळा सुरू होती. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मला अनवाणीच राहावं लागलं.

**२. आकृती पूर्ण करा** (२)




**३. स्वमत**

'शिक्षण' घेण्यासाठी 'गरिबी' हा अडसर ठरत नाही' या विधानाबाबत तुमचे मत लिहा. (३)

## अपठित गद्य

**प्र.१.(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[4M]**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

१) महान कार्य करणाऱ्या व्यक्तींना सहन कराव्या लागणाऱ्या गोष्टी

[ ] [ ]

२) संत ज्ञानेश्वरांना समाजाकडून सहन कराव्या लागलेल्या गोष्टी

[ ] [ ]

महान कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या इतिहासावर नजर टाकली असता लक्षात येते को या महान व्यक्तींना महानता प्राप्त करण्यासाठी वेगळ्या वाटेने जावे लागते. या वाटेवर अनंत अडचणी, अनंत यातना त्यांना सहन कराव्या लागतात संत ज्ञानेश्वराना संतत्व प्राप्तीच्या मार्गात समाजाकडून प्रचंड तिरस्कार, अपमान सहन करावे लागले सावित्रीबाईना स्त्री शिक्षणाचा पाया रचताना प्रचलित समाजविचाराच्या विरोधात गेल्याने समाजाचे बोल. प्रसंगी शेणाचा माराही सहन करावा लागला. महर्षी कर्वेनाही समाजाचा विरोध सहन करत आपला मार्ग आक्रमावा लागला समाजात रूढ असलेल्या विचारप्रवाहाच्या विरोधात जाऊन नवा विचार मांडताना अनेक संकटांना सामोरे जावे लागते हे यातून लक्षात येते. तरीही न डगमगता सतत प्रयत्न करत राहिल्यास या प्रयत्नाचे फळ मिळतेव त्यातून मिळणारा आनंद व समाधान यांचे मोल करता येणे अशक्यच!

**२. १) खालील घटनेचे/कृतीचे परिणाम लिहा.** **(१)**

सावित्रीबाई स्त्री शिक्षणाचा पाया रचताना प्रचलित समाजविचाराच्या विरोधात गेल्या

**२) एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

कोणत्या गोष्टीचे मोल करता येणे अशक्य आहे?

## विभाग २- पदय

**प्र. २. (अ) कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **[8M]**

**१. १) खालील आकृती पूर्ण करा.** **(१)**

काळी आई जगवण्यासाठी अपेक्षित कार्य

मातीमध्ये **राबणाऱ्या** शेतकऱ्यांना पाठबळ देणे | १ | २

२) **चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. जेथे दृष्टी पोहोचते असे ठिकाण — [ ]

ब. कवयित्रीच्या मते जपायची गोष्ट — [ ]

फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उदयाचे, जपून ठेवू सृष्टी.....
धान्य देईना संगणक हा काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबतो, तयास देऊ पुष्टी....
रंग मजेचे, रंग उद्याचे

उधळू, फेकू बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

डोगरातून वाहत येते, खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी?
रंग मजेये, रंग उदयाचे

मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्राच्या संगती
आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखो तुष्टी....
रंग मजेचे, रंग उदयाचे

हिरवी हिरवी मने भोवतो, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी.....
रंग मजेचे, रंग उदयाचे

२. १) 'कष्ट करणाऱ्यांना मदत करू या आशयाची ओळ शोधा. (१)

२) 'दौलत' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा. (१)

३. **खालील शब्दांचे अर्थ लिहा.** (२)

१. फेनभवल - २. अनोखी - ३. वृष्टी - ४. तुष्टी -

४. 'हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी' या ओळींचे आशवसौंदर्य स्पष्ट करा. (२)

**प्र. २. (आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.** **[8M]**

१. "हिरवंगार झाडासारखं" २. "योगी सर्वकाळ सुखदाता"

१. **प्रस्तुत कवितेच्या कवीचे/कवयित्रीचे नाव लिहा** (१)

२. प्रस्तुत कवितेचा विषय लिहा (१)

३. 'पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांच असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते' या ओळीचा सरळ अर्थ लिहा. (२)

**किंवा**

'जळ वरिवरि क्षाळी मळ | योगिया सबाह्य करी निर्मळ|
उदक सुखी करी एक वेळ | योगी सर्वकाळ सुखदाता||' या ओळींचा सरळ अर्थ लिहा.

४. कवितेतून मिळणारा संदेश लिहा. (२)

**५. खालील शब्दांचे अर्थ लिहा.** (२)

हिरवंगार झाडासारखं –

अ. मौन  ब. खुडणे  क. व्रत  ड. पानझड

किंवा

योगी सर्वकाळ मुखदाता -

अ. पांखोवा  ब. जेवीं  क. निवविणे  ड. निजज्ञान

**विभाग ३ - स्थूलवाचन**

**प्र.३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा** (६)

१. सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वतःच्या कल्पनेने लिहा

२. होमी भाभा हे स्फूर्तिदायक व्यक्तिमत्व स्पष्ट करा.

३. मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत, ते 'मोठे होत असलेल्या मुलांनो' या पाठा आधारे सविस्तर लिहा

**विभाग ४ - भाषाभ्यास**

**प्र.४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.** [8M]

**१. खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** (२)

१) तुम्ही गावाला कधी जाणार?

२) किती प्रसन्न वातावरण आहे इथे !

**२. कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा.** (२)

१) पडेल ते काम करावे (आज्ञार्थी करा )

२) हा चित्रपट वाईट नाही. (होकारार्थी करा.)

**३. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन )** (४)

१) भारावून जाणे  २) झोकून देणे  ३) संकोच वाटणे

**प्र. ४. (आ) भाषिक घटकांवर अधारित कृती** **[8M]**

**१. शब्दसंपत्ती**

**१) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा,** **(१)**

अ. स्तुती - ब. माती -

**२) खालील शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा.** **(१)**

अ. सरकारकडून शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मिळणारी रक्कम

ब. अनेक माणसाच्या सततच्या रहदारीमुळे तयार झालेली वाट

**३) खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१)**

अ. काका ब. पाहुणी

**४) खालील शब्दांचे वचन बदला.** **(१)**

अ. कुटुंब ब. बांगडी

**२. लेखननियमानुसार लेखन**

**अचूक शब्द ओळखून लिहा.** **(२)**

१) निणर्य / नोर्णय / निर्णय/ निर्णय

२) दैनन्दिनी / दैनंदिनो / दैनंदींनी / दैनंदिनी

**३. खालील वाक्यांतील वविरामचिन्हे ओळखून लिहा.** **(२)**

१) "आज लवकर घरी येशील का?"

२) कुसुमाग्रज हे 'विशाखा' कवितासंग्रहाचे कवी आहेत.

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र.५ (अ) खालील कृती सोडवा.** **(६)**

**१. पत्रलेखन**

**खालील सूचना वाचा व कृती सोडवा**

दि. १ ऑगस्ट २०१९

**रक्तदान! श्रेष्ठ दान!**

सर्व नागरिकांना कळयात येते, की आपल्या परिसरात दि ३ ऑगस्ट ते १० ऑगस्टपर्यंत रक्तदान शिबीर आयोजित केले जार आहे. तरी इच्छुक रक्तदात्यांनी माननीय संदीप गणवे, व्यवस्थापक पूजा ब्लड बँक यांच्याकडे संपर्क साधावा

साईधाम सोसायटी

| | | |
|---|---|---|
| रक्तदान शिबीर राबवण्यासाठी सोसायटीने जागेची व्यवस्था करावी, म्हणून सोसायटीच्या सचिवांना विनंती पत्र लिहा | किंवा | या उपक्रमात सहभागी होऊन ५० व्या वेळेला रक्तदान केल्याबद्दल सत्कार झालेल्या तुमच्या दादाचे अभिनंदन करणारे पत्र लिहा |

किंवा

२. **सारांशलेखन**

विभाग १ गदय (इ) (प्र. क्र. १ - इ) मधील अपठित उताऱ्याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र.५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(१०)**

१. **जाहिरातलेखन (५० ते ६० शब्द)**

ब्यूटी पार्लरची जाहिरात तयार करा.

२. **बातमीलेखन (५० ते ६० शब्द)**

**खालील विषयावर बातमी तयार करा.**

जिल्हा परिषदेची सरस्वती विद्यालय ही प्राथमिक शाळा डिजिटल झाली आहे.

(प्रोजेक्टर, ऑडिओ - व्हिडीओ सीडीज इत्यादी साहित्य उपलब्ध, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हस्ते उदघाटन)

३. **कथालेखन (८० ते ९० शब्द)**

**खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.**

गावातील नदीला पूर - शेतकऱ्याचे घर उद्ध्वस्त - जीव फक्त वाचला - शेतकरी पूर्णपणे निराश - कोळयाच्या जाळ्यावर नजर - आशा पुन्हा निर्माण

**प्र. ५. (इ) लेखनकौशल्य** **(८)**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा (शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

१. **प्रसंगलेखन**

पारितोषिकप्राप्त मित्राच्या आनंदात सहभागी होण्यासाठी तुम्ही शालेय वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमास उपस्थित राहिला होतात, अशी कल्पना करा व त्या प्रसंगाचे लेखन करा.

ज्ञानगंगा माध्यमिक विद्यालय, रत्नागिरी
वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम २०१७-१८

दिनांक
२२ डिसेंबर

- प्रमुख पाहुणे -
श्री. महेश सकपाळ
- अध्यक्ष -
श्री. राजय देशमख

वेळ संध्याकाळी
४ वा.

सर्वांगी उपस्थिती प्रार्थनीय आहे
न २२ डिसेंबर
स्थळ - शाळेचे पटांगण

**२. आत्मकथन**

**भाजीवाली तुमच्याशी बोलत आहे अशी कल्पना करून पुढील मुद्द्यांच्या आधारे तिचे आत्मकथन लिहा.**




**३. वैचारिक लेखन**

**माणसा माणसा कधी होशील माणूस?...' या विषयावर खालील मुद्द्यांच्या आधारे लेखन करा.**




*Together we will make a difference*